रेमुनं. १४७/२०१६

## नि. १९ खालील आदेश

१ प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम २६ नियम ९ नुसार न्यायालयीन आयुक्तांच्या नेमणूकीसाठी दिलेला आहे. अर्जातील कथनानुसार दावा मिळकत वादीच्या कबजे वहीवाटीत असून प्रतिवादी त्यास हरकत अडथळा करत असल्याने मनाई मिळावी म्हणून दावा केला आहे. प्रतिवादीने दिलेल्या कैफीयतीनुसार त्यांनी दावा मिळकतीमध्ये कोणतेही बांधकाम केलेले नाही. वादीचा सर्व्हे क्रमांक व प्रतिवादीने नमूद केलेला सर्व्हे क्रमांक यांचा मूळ सर्व्हे नंबर १६९ असा होता. प्रतिवादींनी त्यांची मिळकत खरेदी केलेली आहे. वादी व प्रतिवादीच्या क्षेत्राची मोजणी केल्याशिवाय प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थिती अभिलेखावर येणार नाही. सबब अर्ज मंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

२ प्रतिवादीने सदर अर्जास निशाणी २५ प्रमाणे म्हणणे देवून सर्व कथनांचा इन्कार केला. प्रतिवादीच्या कथनानुसार दावा मिळकतीचे वर्णन चुकीचे आहे. प्रतिवादीने दावा मिळकतीमध्ये बांधकाम केलेले नाही. प्रस्तुत प्रकरणात आयुक्तांची नेमणूक होणे आवश्यक नाही. वादीने केवळ पुरावा गोळा करणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दिला असल्यामुळे तो नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

३ वादीतर्फे श्री कामत तर प्रतिवादीतर्फे श्री फडतरे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांची पडताळणी केली. प्रस्तुतचा दावा वादीने केवळ मनाई हुकूमासाठी तसेच मालकी हक्क जाहीर होवून मिळावा यासाठी दाखल केला आहे. वादीने कथन केल्याप्रमाणे दिनांक १३/४/१९८९ सालच्या खरेदीखताप्रमाणे ती दावा मिळकतीत मालकी हक्काने कबजेदार आहे. प्रतिवादींनी कैफीयत देवून दावा मिळकतीचे वर्णन चुकीचे असल्याचे नमूद केले. प्रतिवादीच्या कथनानुसार त्यांनी दिनांक २७/१/२०१६ रोजी अडीच आर क्षेत्र खरेदी केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात प्रथमदर्शनी दावा मिळकतीच्या चतु:सिमेबाबत वाद उपस्थित झाल्याचे स्पष्ट आहे.

४ प्रस्तुतचा दावा हा मालकी हक्क जाहीर होवून मिळणेसाठी व कायम मनाई हुकूमासाठी दाखल केला आहे. वादीने तोंडी व कागदोपत्री पुरावा देवून दावा मिळकतीमधील तिची मालकी व कबजे वहीवाट सिध्द करणेची आहे. केवळ प्रतिवादीने दावा मिळकतीचे वर्णन चुकीचे असल्याचा बचाव घेतल्यामुळे न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक करावी असे नाही. न्यायाच्या प्रचलित तत्वानुसार पुरावा गोळा करणेसाठी आयुक्तांची नेमणूक करता येत नाही. सबब प्रस्तुतचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र असल्यामुळे मी पुढील आदेश देत आहे :—

## आदेश

**अर्ज नामंजूर करणेत आला.**

दि. १८/८/२०१६

सुमित वि. जोशी
सह दिवाणी न्यायाधीश क.स्त.,दौंड जि. पुणे